**MHST**060007242015

## रे. दि. मु. नं. १९२/२०१५ नि ६५ खालील आदेश

१. प्रतिवादी क्र ३ ने विना कैफियत आदेश रदद् होवून त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेसाठी अर्ज दिलेला आहे. वादीचे सदर अर्जावर दाखल केलेल म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२. अभिलेखावरील कागदपत्रांचे वाचन केले असता असे दिवून येते की प्रतिवादी क्र ३ यास दि. १७.१०.२०१५ समन्स तामिल झाले होते. मार्च २०२० ते ७ सप्टेंबर २१ पर्यंत कोरोना कार्यकाळ विलंबातून वगळण्यास पात्र आहे परंतु तत्पूर्वीचा कार्यकाळ पाहता ५ वर्षे उशीर प्रतिवादीला लेखी कैफियत दाखल करणेस झालेला आहे. अदयाप पर्यंत दाव्या मध्ये फक्त सरतपास दाखल केलेला आहे. दाव्यातील वाद गुणवत्तेवर निकाली काढणेसाठी प्रतिवादीची कैफियत आवश्यक आहे, त्यामुळे सदरचा अर्ज हा खर्चावर मंजूर करणेस पात्र आहे. त्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करणेत येतो.

## आदेश

१. अर्ज रक्क्म रुपये २०००/– खर्चाने मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ ने वादीला पुढील तारखे पर्यंत परिव्येय खर्च म्हणून देणे व तो खर्च दिल्यानंतर विना कैफियत आदेश रदद् समजणेत येईल.

दहिवडी. (आर. आर. थोरात)

दि.२२.१२.२०२१ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दहिवडी.